प्राथमिक शाळांतील इयत्ता 1 ली ते 5 वी तील मुलांना "पोषण आहार योजना".

लेखाधिका-यांची पदे ----

**महाराष्ट्र शासन**
शालेय शिक्षण विभाग,
शासन निर्णय, क्रमांकः पूप्राशा-1196/2410/(5/96)/प्राशि-4,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-400 032, दिनांक 5 डिसेंबर, 1996.

वाचा :- (1) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग, क्रमांकः पूप्राशा 1095/2134/प्राशि-2, दिनांक 22 नोव्हेंबर, 1995.

(2) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग, क्रमांकः पूप्राशा-1096/(79/96)/प्राशि-4, दिनांक 31 ऑगस्ट, 1996.

(3) शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे, यांचे क्रमांकः मपब-1095/पोषण आहार/ब-1, दिनांक 9 जानेवारी, 1996 चे पत्र.

**शासन निर्णय :-** शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग क्रमांकः पूप्राशा-1095/2134/प्राशि-2, दिनांक 22 नोव्हेंबर, 1995 अन्वये सन 1995-96 या वर्षापासून राज्यातील 25 जिल्ह्यांतील सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या पुनर्रचित 171 गटांतील ग्रामीण भागातील प्राथमिक शाळांतील इयत्ता 1 ली ते 5 वी तील विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार योजना लागू करण्यात आली आहे. तसेच शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग, क्र. पूप्राशा-1096/(79/96)/प्राशि-4, दिनांक 31 ऑगस्ट, 1996 अन्वये 1996-97 या वर्षी राष्ट्रीय स्त्री साक्षरतेच्या प्रमाणापेक्षा स्त्री साक्षरतेचे प्रमाण कमी असलेल्या 29 नवीन गटांचा समावेश करून एकूण 27 जिल्ह्यांतील 200 गटांत सुरु करण्यात आली आहे. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी ही योजना ज्या तालुक्यात लागू करण्यात आली आहे व पुढे लागू करण्यात येणार आहे, त्या विकासगटांत गट शिक्षणाधिकारी यांच्या कार्यालयात लेखाधिका-याचे पद रु.2000-3500/- या वेतनश्रेणीत निर्माण करण्यास शासनाने शासन निर्णय, दिनांक 22 नोव्हेंबर, 1995 अन्वये मान्यता दिली आहे. सदर योजनेच्या यशस्वी अंमलबजावणीचे दृष्टीने व प्रशासनिक अडचणी विचारात घेता, गट शिक्षणाधिका-यांच्या कार्यालयात निर्माण करण्यात आलेले लेखाधिका-याचे पद श्रेणी अवनत करून म्हणजेच रु.2000-3500 या वेतन-श्रेणीऐवजी रु.1640-2900 या वेतनश्रेणीतील सामान्य राज्य सेवा, वर्ग-ब, अधीक्षक या संवर्गात रुपांतरित करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. शासनाच्या दिनांक 22 नोव्हेंबर, 1995 च्या शासन निर्णयान्वये नियुक्त करण्यात आलेल्या राज्यस्तरीय समितीने या प्रश्नाचा विचार करून गट शिक्षणाधिका-यांचे कार्यालयात निर्माण करण्यात आलेली लेखाधिका-यांची पदे सामान्य राज्य सेवा, वर्ग-ब, अधीक्षक, या संवर्गात रुपांतरीत करण्याची शिफारस केली. शासनाने ही शिफारस स्विकारली असून शालेय पोषण आहार योजनेच्या अंमलबजावणी करता गट शिक्षणाधिका-यांच्या कार्यालयात सामान्य राज्य सेवा, वर्ग-ब अधीक्षक या संवर्गातील पद निर्माण करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

2. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी वरीलप्रमाणे त्वरित कार्यवाही करावी.

3. हा शासन निर्णय, वित्त विभागाच्या सहमतीने त्या विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.828/सेवा-10, दिनांक [illegible] नोव्हेंबर, 1996 अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

9 JAN 1997

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(वि. र. जोशी.)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.